**शेतक-यांच्या मृत जनावरांकरिता मदत : शेतक-यांना प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन**



दि. १९: ज्या शेतक-यांची जनावरे विविध पिकांचे फुटवे खाल्ल्याने विषबाधा होऊन दगावतात. अशा शेतक-यांना बळीराजा चेतना अभियानाच्या वतीने आर्थिक मदत देण्यात येत आहे. त्यामुळे शेतक-यांनी पिकांचे फुटवे खावून दगावलेल्या मृत जनावरांचे प्रस्ताव संबंधीत तहसील कार्यालयात सादर करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सचिन्द्र प्रताप सिंह यांनी केले आहे.

शेतक-यांची भाकड व दुधाळ जनावरे पिकांचे फुटवे खावून मृत होतात. अशा वेळी शासनाच्या कुठल्याही योजनेतून मदत मिळत नाही. त्यामुळे अशा प्रकरणाबाबत बळीराजा चेतना अभियानांतर्गत शेतक-यांना आर्थिक मदत करण्यात येत आहे. शेतक-यांकडे असलेल्या गाय, म्हैस या दुधाळ प्रति जनावरांसाठी १० हजार रूपये मदत देण्यात येत आहे. तर भाकड गाय, म्हैस व बैल यांना प्रति ५ हजार असे प्रत्येक कुटुंबाकरिता २ जनावरे या मर्यादेत मदत दिली जात आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी त्या शेतक-यांची उपजिविका केवळ शेतीवर अवलंबून असावी. कुटुंबातील सदस्य शासकिय व निमशासकिय नोकरीत नसावा, त्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न एक लाखाच्या वर नसावे. तसेच शेतकरी कुटुंबाना या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधीत ७/१२, उत्पन्नाचा दाखला, मृत जनावरांच्या शवविच्छेदनाचा अहवाल, गावामध्ये स्थापन करण्यात आलेल्या बळीराजा चेतना अभियानाच्या ग्रामस्तरीय समितीचा अहवाल या कागपत्रांची पुर्ततेसह तहसीलमध्ये प्रस्ताव सादर करावा. या योजनेचा लाभ जिल्हयातील शेतक-यांनी घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी सचिन्द्र प्रताप सिंह यांनी केले आहे.

............................................